# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक: 04.12.2021** **वार: शनिवार**

---

**कोविड-19 विरुद्ध प्रतिबंधक लसीच्या 150 कोटींहून अधिक मात्रा पूर्ण करण्याच्या दिशेनं देश अग्रेसर आहे. दरम्यान, कोरोनाचा नवा प्रकार सापडल्यामुळे चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहोत की शक्य तितक्या लवकर लसींच्या दोन्ही मात्रा पूर्ण कराव्या आणि इतरांनाही लस घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावं. मुखपट्टी, सामाजिक ठिकाणी सुरक्षित अंतर, हात आणि चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करावं. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011- 23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

**ठळक बातम्या**

•देहराडून इथल्या विविध विकास प्रकल्पांची आज पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी

•ओमिक्रॉन संसर्गाबाबत घाबरून न जाता सावधानता बाळगण्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमुख वैज्ञानिक सौम्या स्वामीनाथन यांचं आवाहन

•ओमिक्रॉन विरुद्ध लढण्यासाठी देशात आवश्यक त्या सर्व उपाययोजना तैनात असल्याची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची लोकसभेत ग्वाही

•सागरी आव्हानांना तोंड देण्यास भारतीय नौदल सज्ज असल्याची नौदलप्रमुख अडमिरल आर.हरिकुमार यांची ग्वाही आणि

•आशियाई युवा पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताची गोळाफेकपटू अनन्या बन्सलला रौप्यपदक

**पंतप्रधान उत्तराखंड**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या देहराडून इथं अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत.या प्रकल्पांसाठी साधारण 18 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. रस्ते विकासातून प्रवास सुकर करणं आणि या भागात पर्यटनाचा विकास करणं हा या प्रकल्पांचा प्रमुख उद्देश आहे. दिल्ली-देहराडून इकॉनॉमिक कॉरिडॉरसह इतर 11 प्रकल्पांचा यात समावेश आहे.

**ओमिक्रॉन डब्ल्यूएचओ**

कोरोनाचा उत्परिवर्तित ओमिक्रॉन विषाणू हा अतिशय संसर्गजन्य असला तरी लोकांनी घाबरून जाऊ नये असं आवाहन जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमुख वैज्ञानिक सौम्या स्वामीनाथन यांनी केलं आहे. आपण सावध आणि सज्ज राहायला हवं, पण घाबरण्याची गरज नाही, कारण गेल्यावर्षीपेक्षा सध्याची परिस्थिती वेगळी आहे असंही त्या म्हणाल्या. लसींचा सकारात्मक परिणाम या काळात दिसून येत असल्याचा विश्वास स्वामीनाथन यांनी व्यक्त केला. सध्या जगभरातल्या कोरोना रुग्णांपैकी 99 टक्के रुग्ण हे कोरोनाच्या उत्परिवर्तित डेल्टा विषाणूचे असल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान ओमिक्रॉनने जगभरातल्या 38 देशांमध्ये शिरकाव केला असला तरी अद्याप या विषाणूमुळे कुणाचाही मृत्यू झाला नसल्याची माहिती जागतिक आऱोग्य संघटनेने काल दिली.

**मांडवीय-लोक सभा चर्चा**

कोरोनाच्या उत्परिवर्तीत ओमिक्रॉन या विषाणूविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना केली जात असल्याची ग्वाही केंद्रीय आरोग्यमंत्री डॉक्टर मनसुख मंडवीय यांनी काल लोकसभेत दिली. लोकसभेत काल कोविड विषयक दीर्घ चर्चा झाली, त्यात मांडवीय बोलत होते. कर्नाटकात आढळून आलेल्या ओमिक्रॉनचा संसर्ग झालेल्या दोन्ही रुग्णांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी अर्थात जेनोम सिक्वेन्सिंगसाठी पाठवण्यात आले असून, त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची चाचणीही करण्यात येत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. कोविड 19 आजाराशी लढा देण्यात अग्रेसर असलेल्या आरोग्य कर्मचारी आणि कोविड योद्ध्यांची मांडवीय यांनी या वेळी प्रशंसा केली.कोविड19 प्रतिबंधक लसींची वर्धक मात्रा अर्थात बूस्टर डोस देण्याबाबत तज्ञांचं मत घेतल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी यासंदर्भातल्या एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलं.

**देश-लसीकरण**

देशव्यापी कोविड लसीकरण अभियानात आतापर्यंत लसीच्या126 कोटी 44 लाख मात्रा देण्यात आल्या आहेत. काल एका दिवसात देशभरात 66 लाख 58 हजार जणांनी लसीची मात्र घेतली.

**नौदल दिवस**

आज भारतीय नौदल दिन आहे.राष्ट्रपती रामनाथ कोविंद, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह गृहमंत्री अमित शहा यांनी नौदलातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना नौदल दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय नौदल हे सागरी क्षेत्रातल्या कोणत्याही आव्हानाला उत्तर द्यायला सज्ज आहे असं प्रतिपादन नौदलप्रमुख अडमिरल आर. हरिकुमार यांनी काल नौदल दिवसाच्या पूर्वसंध्येला केलं. आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत भारत स्वदेशी पाणबुड्या आणि युद्धनौकांची निर्मिती करत आहे. सहयोगी देशांशी

भारताचे संबंध मजबूत झाले आहेत. नौदलाच्या आधुनिकीकरणावर जोर दिला जात आहे असंही हरिकुमार यांनी म्हटलं आहे.

**श्रीपाद नाईक**

केंद्रीय बंदरं, जहाजं आणि जलवाहतूक खात्याचे राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी काल नवी मुंबई इथल्या जवाहरलाल नेहरू बंदराला भेट दिली. हे देशातलं महत्त्वाचं बंदर आहे. या भेटीदरम्यान नाईक यांनी बंदराच्या कामकाजाची, नुकत्याच झालेल्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक कामांची पहाणी केली.

**इराण चर्चा**

2015 साली इराण आणि पाश्चात्य देशांमध्ये झालेला अणुकरार पुनर्स्थापित करण्यासाठी या दोन पक्षांमध्ये गेल्या 5 दिवसांपासून सुरू असलेली औपचारिक चर्चा काल स्थगित करण्यात आली. पुढच्या आठवड्यात ही चर्चा पुन्हा सुरू होणार आहे. युरोपीय महासंघ या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहे. या चर्चेदरम्यान काही मुद्द्यांवर प्रगती झाली असली तरी काही बाबतीत अजून एकवाक्यतेची गरज असल्याचं युरोपीय महासंघाने म्हटलं आहे.

**महसूल गुप्तचर संचालनालय**

महसूल गुप्तचर संचालनालयाचा आज 64 वा स्थापना दिवस आहे. यानिमित्ताने क्षेत्रीय सीमाशुल्क अंमलबजावणी बैठकीचं आयोजन संचालनालयाकडून करण्यात आलं आहे. तसंच वर्ष 2020-21साठीच्या भारतातल्या तस्करीबाबतचा अहवालही यावेळी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. महसूल गुप्तचर संचालनालय ही तस्करीविरोधात काम करणारी देशाची महत्त्वाची संस्था आहे.

**साहित्य संमेलन**

विसावं शतक हे विज्ञानाचं शतक आहे; मात्र, विज्ञान साहित्याच्या बाततीत मराठीचं अपूर्णत्व जाणवत असल्याची खंत 94 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जयंत नारळीकर यांनी काल व्यक्त केली. नाशिकच्या कुसुमाग्रज नगरीत काल 94व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन झालं. डॉ नारळीकर प्रकृती अस्वास्थ्यामुळे संमेलनाला अनुपस्थित होते; दृकश्राव्य माध्यमातून त्यांनी उद्घाटन समारंभाला संबोधित केलं. इंग्रजी ही विज्ञानाची भाषा म्हणून मान्यता पावलेली भाषा आहे. जगभर ती वापरली जाते. तज्ञ लोकांच्या समित्या या इंग्रजी शब्दांचं कृत्रिम मराठी भाषांतर देऊ शकतील. पण सामान्य वाचक जर अशा शब्दांना स्वीकारू इच्छित असेल, तर ते शब्द वापरण्यावर बंदी का असावी, असा सवाल त्यांनी केला? विज्ञानकथांचे प्रकार, दर्जा, विज्ञानकथांची समीक्षा, त्यांचं स्वतःचं विज्ञान कथालेखन याविषयी सविस्तर विवेचन नारळीकर यांनी

केलं. पुढचे दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य उत्सवात अनेक विषयांवरील परिसंवाद, चर्चासत्र, कवी संमेलन असे अनेक कार्यक्रम होणार आहेत.

**हॉकी भारत**

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेतर्फे ओडिशा इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या कनिष्ठ गटाच्या विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत काल जर्मनीने भारताचा 4-2 असा पराभव केला. आता जर्मनीचा अंतिम फेरीतला सामना रविवारी अर्जेंटिनाशी होईल.तर भारत कास्यपदकासाठी फ्रान्सविरोधात खेळेल.अर्जेंटिनाने दुसऱ्या उपांत्य सामन्यात पेनल्टी शूटआऊटमध्ये फ्रान्सचा पराभव केला होता.

**आशिया पॅरालिम्पिक गोळाफेक**

बाहरेनच्या मनामा इथं सुरू असलेल्या आशियाई युवा पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताची गोळाफेकपटू अनन्या बन्सलने काल पहिलं रौप्यपदक पटकावलं. भारताच्या पॅरालिम्पिक समितीच्या अध्यक्ष दीपा मलिक यांनी या कामगिरीबद्दल तिचं अभिनंदन केलं आहे.

**क्रिकेट**

मुंबईत सुरु असलेल्या भारत आणि न्यूझीलंड संघादरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल यजमान भारतीय संघाने पहिल्या दिवसअखेर 4 बाद 221 धावा फटकावल्या. कालच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा शतक झळकावणारा मयंक अग्रवाल आणि वृद्धीमान सहा धावपट्टीवर होते. तत्पूर्वी भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

**आंध्र प्रदेश वादळ**

आंध्र प्रदेशच्या उत्तर किनारपट्टीवर सध्या जवाद चक्रीवादळाचं सावट आहे. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या वादळाचा सर्वात मोठा फटका शेतीला बसण्याची शक्यता आहे. जवाद चक्रीवादळ आज बंगालच्या उपसागराच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे आंध्र प्रदेशातल्या तीन जिल्ह्यांना राज्य प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. योग्य ती सर्व काळजी घेण्याचे निर्देश आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांनी दिले आहेत.जवादच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या विविध शहरांमध्ये उद्या होणार असलेल्या यूजीसी-नेटच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सुधारित तारीख नंतर जाहीर केली जाईल असं राष्ट्रीय परीक्षा संस्थेने कळवलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; नमस्कार**